प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

नोव्हेंबर 6, 2017

**ब्रम्हावर्त कमर्शियल कोऑपरेटिव बँक लि., कानपुर, उत्तर प्रदेश ह्यांना देण्यात आलेल्या निदेशांना, आरबीआयकडून मार्च 6, 2018 पर्यंत मुदतवाढ**

ब्रम्हावर्त कमर्शियल कोऑपरेटिव बँक लि., कानपुर ह्यांना देण्यात आलेल्या निदेशांचा, आरबीआयकडून, पुनरावलोकनाच्या अटीवर, आणखी चार महिन्यांच्या कालावधीसाठी (नोव्हेंबर 7, 2017 ते मार्च 6, 2018) मुदतवाढ देण्यात आली आहे. वरील बँक, जुलै 7, 2015 पासून बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 च्या (एएसीएस) कलम 35अ खालील, निदेशांखाली ठेवण्यात आली होती. निदेश दि. नोव्हेंबर 1, 2017 अन्वये वरील निदेशांची मुदत मार्च 6, 2018 पर्यंत वाढविण्यात आली आहे. जनतेच्या माहितीसाठी नोव्हेंबर 1, 2017 रोजीच्या निदेशाची एक प्रत वरील बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व बँकेने निदेशात बदल केला ह्याचा अर्थ, वरील बँकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा किंवा घट झाली असल्याबाबत रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये. परिस्थितीवर अवलंबून वरील निदेशात बदल करण्याचा विचार रिझर्व बँक करु शकते.

**अनिरुध्द डी जाधव**
सहाय्यक व्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/1251**